महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
वनार्टी कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था
(वनार्टी), महाराष्ट्र राज्य,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर -४४००२२
Website : www.vanarti.in CIN: U84120MH2026NPL466492 ई-मेल :vanarti.info@gmail.com

जा .क्र. वनार्टी /नागपूर/आस्था/ 832/2026-27 दिनांक :-26/08/2026

**शैक्षणिक वर्ष 2024 करिता पीएच.डी. अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJ-NT) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्याबाबत.**

**संदर्भ :**

1. शासन निर्णय क्र. सान्यावि-2023/प्र.क्र.60(4)/बांधकामे, दि. 01 जुलै 2026.
2. बैठक क्र. 2024/प्र.क्र.03/बांधकामे, दि. 30 जून 2026.
3. अ.मु.स. (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली दि. 17 जून 2026 रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय.
4. महाज्योती संस्थेमार्फत शैक्षणिक वर्ष 2025 करिता प्रसिद्ध करण्यात आलेली पीएच.डी. अधिछात्रवृत्तीची जाहिरात – एकूण 100 जागा.
5. वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) संचालक मंडळाची दि. 25 ऑगस्ट 2026 रोजीची बैठक व ठराव क्र. 26.

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) ही विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, संशोधन व प्रशिक्षणविषयक प्रगतीसाठी कार्यरत संस्था आहे. महाज्योती संस्थेमार्फत शैक्षणिक वर्ष 2024 करिता पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी यापूर्वी एकूण 100 जागांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली असून, त्यापैकी 35 जागा विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. वनार्टी संस्थेची नोंदणी दिनांक 23 जानेवारी 2026 रोजी झालेली असून, आर्थिक वर्ष 2026-27 करिता संस्थेसाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद मर्यादित असल्याने पीएच.डी. अधिछात्रवृत्तीकरिता यापूर्वी संस्थेमार्फत स्वतंत्र जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली नव्हती.

तथापि, VJNT प्रवर्गातील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून पीएच.डी. अधिछात्रवृत्ती उपलब्ध करून देण्याबाबत मोठ्या प्रमाणावर मागण्या व निवेदने संस्थेस प्राप्त झाली आहेत. सदर मागण्यांचा तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व संशोधनविषयक हिताचा विचार करून, दि. 25 ऑगस्ट 2026 रोजी झालेल्या वनार्टीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये ठराव क्र. 26 अन्वये पीएच.डी. अधिछात्रवृत्तीच्या 17 अतिरिक्त जागांना मान्यता देण्यात आलेली आहे.

**अधिछात्रवृत्तीच्या जागांची उपलब्धता व निवड प्रक्रिया**

सदर 17 जागांवर पात्र विद्यार्थ्यांची निवड महाज्योती संस्थेकडे शैक्षणिक वर्ष 2024 करिता प्राप्त झालेल्या पीएच.डी. अधिछात्रवृत्तीच्या अर्जांमधील विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) प्रवर्गातील पात्र अर्जदारांमधून करण्यात येईल. त्यामुळे सदर 17 जागांसाठी वनार्टी संस्थेमार्फत स्वतंत्रपणे नव्याने अर्ज मागविण्यात येणार नाहीत. महाज्योती संस्थेकडे प्राप्त अर्जांची छाननी, पात्रता, प्राधान्यक्रम व निवड प्रक्रिया संबंधित शासन निर्णय, मार्गदर्शक सूचना व लागू नियमांनुसार करण्यात येईल. महाज्योती संस्थेकडून पात्र अर्जदारांची आवश्यक माहिती/यादी प्राप्त झाल्यानंतर वनार्टी संस्थेमार्फत अंतिम प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

**शाखानिहाय जागांचे वाटप**

संचालक मंडळाने मंजूर केलेल्या एकूण 17 जागांचे विषय/शाखानिहाय वाटप पुढीलप्रमाणे राहील :

| अ.क्र. | शाखा / विषय गट | मंजूर टक्केवारी | जागा |
|---|---|---|---|
| 1 | विज्ञान व तंत्रज्ञान (Science & Technology) | 55% | 9 |
| 2 | मानव्यविद्या व सामाजिक विज्ञान (Humanities & Social Sciences) | 25% | 4 |
| 3 | आंतरविद्याशाखीय अभ्यास (Interdisciplinary Studies) | 10% | 2 |
| 4 | वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce & Management) | 10% | 2 |
| एकूण | | 100% | 17 |

वरील शाखानिहाय जागांमध्ये अपूर्णांक येत असल्याने एकूण 17 जागांची पूर्तता होईल अशा पद्धतीने अनुक्रमे 9, 4, 2 व 2 जागांचे वाटप करण्यात येत आहे.

**पात्रतेचे निकष**

सदर अधिछात्रवृत्तीकरिता उमेदवाराने खालील अटी व शर्ती पूर्ण करणे आवश्यक राहील :

1. अर्जदार हा विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) प्रवर्गातील असावा व त्याच्याकडे वैध जातीचा दाखला असणे आवश्यक आहे.
2. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
3. अर्जदाराची पीएच.डी. नोंदणी दि. 1 जानेवारी 2024 ते दि. 31 डिसेंबर 2024 या कालावधीत झालेली असणे आवश्यक आहे.
4. अर्जदाराची पीएच.डी. नोंदणी कायमस्वरूपी (Confirmed Ph.D. Registration) झालेली असणे आवश्यक आहे.
5. अर्जदाराने पीएच.डी. नोंदणी कालावधीतील किंवा त्यालगतच्या मागील वर्षातील विहित संशोधन पात्रता परीक्षा उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे.
6. परीक्षा पात्रतेमध्ये पुढीलप्रमाणे प्राधान्यक्रम राहील :
    - NET / CSIR-NET / GATE / GPAT / ICAR / AcSIR व समतुल्य राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा;

- SET / MCAER व समतुल्य परीक्षा;
- PET, विहित पात्रता गुणांसह.

7. अर्जदारास पदव्युत्तर पदवीमध्ये किमान B+ ग्रेड किंवा शासनाने विहित केलेली समतुल्य पात्रता असणे आवश्यक आहे.
8. अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक एकूण उत्पन्न रु. 8.00 लाखांपेक्षा अधिक नसावे.
9. अर्जदाराचे वय संबंधित पात्रता दिनांकास 35 वर्षांपेक्षा अधिक नसावे, शासन/UGC च्या लागू मार्गदर्शक सूचनांनुसार वयोमर्यादा विचारात घेतली जाईल.
10. अर्जदार महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक विद्यापीठ, अभिमत विद्यापीठ, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील मान्यताप्राप्त संशोधन केंद्र, केंद्रीय विद्यापीठ किंवा संसदीय कायद्यानुसार मान्यता प्राप्त राष्ट्रीय संशोधन संस्थेत पीएच.डी.साठी नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
11. राष्ट्रीय स्तरावरील NET किंवा इतर राष्ट्रीय स्तरावरील संशोधन पात्रता परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांना शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राधान्य देण्यात येईल.
12. महिला, दिव्यांग व अनाथ उमेदवारांसाठी शासनाच्या लागू आरक्षण धोरणानुसार अनुक्रमे 30%, 5% व 1% आरक्षण लागू राहील. संबंधित आरक्षित जागांसाठी पात्र अर्जदार उपलब्ध न झाल्यास शासनाच्या नियमानुसार त्या जागा इतर पात्र उमेदवारांमधून भरण्यात येतील.

**अधिछात्रवृत्तीचा कालावधी**

1. अधिछात्रवृत्तीचा कमाल कालावधी 5 वर्षे राहील.
2. पीएच.डी. नोंदणी दिनांकापासून 5 वर्षे किंवा पीएच.डी. प्रबंध सादर करण्याचा कालावधी यापैकी जो आधी असेल तो कालावधी अधिछात्रवृत्तीसाठी ग्राह्य राहील.
3. सुरुवातीला 2 वर्षांसाठी कनिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती (JRF) मंजूर करण्यात येईल.
4. JRF कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्रिस्तरीय समितीचा अहवाल व Upgradation Certificate प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार वरिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती (SRF) मंजूर करण्यात येईल.
5. 5 वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अधिछात्रवृत्तीची मुदतवाढ दिली जाणार नाही.

**अधिछात्रवृत्तीचे स्वरूप**

| **अधिछात्रवृत्ती** | | |
|---|---|---|
| **पीएच.डी** | रुपये ३७,०००/- प्रति महा | **कनिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती (JRF)** |
| | रुपये ४२,०००/- प्रति महा<br>(त्रिस्तरीय समिती अहवाल व Upgradation प्रमाणपत्र सादर केल्यानंतर) | **वरिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती (SRF)** |

| | | |
|---|---|---|
| | दिव्यांग उमेदवारांसाठी रु.२०००/- प्रती महा | **कनिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती (JRF) व वरिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती (SRF)** |

अधिछात्रवृत्ती व्यतिरिक्त घरभाडे भत्ता, आकस्मिक खर्च अथवा इतर कोणतेही अतिरिक्त लाभ स्वतंत्रपणे अनुज्ञेय राहणार नाहीत, जोपर्यंत शासन/संस्थेच्या स्वतंत्र निर्णयाने तसे मंजूर केलेले नसेल.

**अधिछात्रवृत्तीच्या नूतनीकरणासाठी अटी**

अधिछात्रवृत्तीचे पुढील हप्ते/नूतनीकरण खालील अटींच्या पूर्ततेनंतरच अनुज्ञेय राहील :

1. दर सहा महिन्यांनी Research Advisory Committee (RAC) समोर प्रगती अहवाल सादर करून समाधानकारक प्रगतीचा अहवाल प्राप्त करणे.
2. JRF ते SRF उन्नतीसाठी त्रिस्तरीय समितीचा अहवाल व Upgradation Certificate सादर करणे.
3. पीएच.डी. संशोधनाच्या कालावधीत किमान एक दर्जेदार शोधनिबंध मान्यताप्राप्त Peer-reviewed / Web of Science / Scopus-indexed किंवा शासनाने/संबंधित प्राधिकरणाने मान्य केलेल्या समतुल्य दर्जाच्या जर्नलमध्ये प्रकाशित असणे.
4. पीएच.डी. अभ्यासक्रमातील Course Work व संबंधित संशोधनाची आवश्यक कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करणे.
5. संशोधनाची प्रगती समाधानकारक असल्याचे संबंधित विद्यापीठ/संशोधन केंद्र/मार्गदर्शक/RAC यांच्याकडून प्रमाणित होणे.

**आवश्यक कागदपत्रे**

` महाज्योती संस्थेकडे अर्ज करताना सादर केलेली कागदपत्रे तसेच निवडीनंतर वनार्टी संस्थेकडून मागविण्यात येणारी कागदपत्रे यामध्ये आवश्यकतेनुसार पुढील कागदपत्रांचा समावेश राहील :

1. आधार कार्ड
2. आधार सीडिंग प्रमाणपत्र
3. अर्जदाराचा फोटो व स्वाक्षरी
4. महाराष्ट्र रहिवासी प्रमाणपत्र / अधिवास प्रमाणपत्र
5. जातीचा दाखला
6. जातवैधता प्रमाणपत्र, उपलब्ध असल्यास
7. उत्पन्नाचा दाखला
8. पदवी गुणपत्रक
9. पदव्युत्तर गुणपत्रक
10. NET/CSIR-NET/GATE/GPAT/ICAR/AcSIR/SET/MCAER/PET किंवा समतुल्य परीक्षेचे प्रमाणपत्र
11. कायमस्वरूपी पीएच.डी. नोंदणी प्रमाणपत्र
12. संशोधन केंद्राचा रुजू अहवाल
13. दिव्यांग प्रमाणपत्र, लागू असल्यास

14. अनाथ प्रमाणपत्र, लागू असल्यास
15. नावात बदल असल्यास राजपत्र (Gazette)
16. इतर कोणतीही अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्ती किंवा DBT लाभ घेत नसल्याबाबत स्वयंघोषणापत्र
17. कोणत्याही प्रकारची पूर्णवेळ/अर्धवेळ नोकरी किंवा सेवा करीत नसल्याबाबत आवश्यक हमीपत्र/स्वयंघोषणापत्र
18. वनार्टी संस्थेने वेळोवेळी मागविलेली इतर आवश्यक कागदपत्रे.

**नोकरी/सेवेबाबत अट**

अधिछात्रवृत्तीचा लाभ घेणारा संशोधक विद्यार्थी हा पूर्णवेळ पीएच.डी. संशोधक असणे अपेक्षित आहे. अधिछात्रवृत्तीच्या कालावधीत कोणत्याही स्वरूपाची पूर्णवेळ, अर्धवेळ, तासिका तत्त्वावरील अथवा इतर नियमित नोकरी/सेवा स्वीकारल्यास त्याबाबत संस्थेस तत्काळ कळविणे बंधनकारक राहील.

अधिछात्रवृत्तीच्या अटींचे उल्लंघन करून नोकरी/सेवा केल्याचे निदर्शनास आल्यास अधिछात्रवृत्तीचा लाभ स्थगित/रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल तसेच नियमानुसार वसुलीची कार्यवाही करण्यात येऊ शकते.

**प्रगती अहवाल व उपस्थिती**

1. अधिछात्रवृत्तीधारकाने दर सहा महिन्यांनी संशोधन प्रगती अहवाल सादर करणे आवश्यक राहील.
2. प्रगती अहवालावर मार्गदर्शक व संबंधित संशोधन केंद्र/विभागप्रमुख यांची प्रमाणित स्वाक्षरी असणे आवश्यक राहील.
3. आवश्यकतेनुसार संशोधन केंद्रातील उपस्थितीचा/बायोमेट्रिक उपस्थितीचा अहवाल सादर करावा लागेल.
4. RAC च्या पुनरावलोकनात संशोधनाची प्रगती असमाधानकारक आढळल्यास अधिछात्रवृत्ती स्थगित अथवा रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येऊ शकते.
5. अभ्यास सहल, परिषद, कार्यशाळा किंवा संशोधनाच्या अनुषंगाने संशोधन केंद्राबाहेर जाण्याची आवश्यकता असल्यास त्याची योग्य नोंद संबंधित प्रगती अहवालात करणे आवश्यक राहील.

**महत्त्वाच्या सूचना**

1. सदर 17 जागा या वनार्टी संस्थेच्या संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार अतिरिक्त उपलब्ध करून देण्यात आलेल्या जागा आहेत.
2. सदर जागांसाठी स्वतंत्रपणे नवीन जाहिरात प्रसिद्ध करण्याऐवजी महाज्योती संस्थेकडे प्राप्त झालेल्या VJNT प्रवर्गातील पात्र अर्जांमधून उमेदवारांची निवड करण्यात येईल.
3. महाज्योती संस्थेकडून प्राप्त होणाऱ्या पात्र अर्जदारांच्या यादीची वनार्टी संस्थेकडून पुढील प्रशासकीय कार्यवाहीसाठी छाननी/पडताळणी करण्यात येईल.
4. अंतिम लाभ हा संबंधित उमेदवाराने शासन/संस्थेने विहित केलेल्या सर्व पात्रता व अटी पूर्ण केल्यानंतरच अनुज्ञेय राहील.

5. चुकीची माहिती, खोटी कागदपत्रे, पात्रतेचा अभाव, संशोधनातील असमाधानकारक प्रगती किंवा अधिछात्रवृत्तीच्या अटींचा भंग आढळल्यास उमेदवाराची अधिछात्रवृत्ती रद्द करण्याचा अधिकार संस्थेस राहील.
6. अधिछात्रवृत्तीचा लाभ घेत असताना अन्य कोणत्याही अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्तीचा दुहेरी लाभ घेता येणार नाही.
7. शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे आदेश, शासन निर्णय, मार्गदर्शक सूचना व अटी व शर्ती अधिछात्रवृत्तीधारकास बंधनकारक राहतील.
8. सदर योजनेअंतर्गत कोणताही वाद उद्भवल्यास प्रचलित शासन नियम व संस्थेच्या सक्षम प्राधिकाऱ्याचा निर्णय अंतिम राहील.

**निधी व अर्थसहाय्य**

सदर 17 पात्र व अंतिमतः निवड झालेल्या उमेदवारांना वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) यांच्यामार्फत, उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद व शासनाच्या लागू नियमांच्या अधीन राहून पीएच.डी. अधिछात्रवृत्तीचे अर्थसहाय्य करण्यात येईल. सदर अधिछात्रवृत्तीचा लाभ हा संबंधित विद्यार्थ्यांच्या पात्रतेची पडताळणी, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, संशोधन प्रगती व उपलब्ध निधी याच्या अधीन राहील.

**स्वा**
**प्रशांत वावगे**
**प्र. व्यवस्थापकीय संचालक**
**वसंतराव नाईक संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था, (वनार्टी)**